It began oh girl like this.
With me n u on the verge to kiss
Holding ur face in my hands
Flowing between eyes ur hair strands
Staring n staring in ur eyes
As ur lips came close to mines
But just as our lips touched
My world got fully tossed
Mountains came down n water went up
Birds started swimming n fishes flying up
My mother shaking me to be awake
And thats how oh this lovely dream ended.......

-SE EXTC, Mr. Jay Mistry

## माणूस

शेवटी कोणी कोणाचा नसतो
माणूस एकटाच जगतो आणि मरतोही एकटाच
मग भावनांच्या पाशात का अडकावे ?
आशा, अपेक्षा, स्वप्ने पूर्ण करण्यात
आयुष्य जाते भरूनी,
अंधाराकडून प्रकाशाकडे, प्रकाशातून अंधाराकडे
जावेच लागते प्रत्येकांस,
मग अर्थशून्य, भावनाशून्य आयुष्य असे का म्हणावे,
ध्येयासाठी झगडावे,
परी उगाच न झुरवे,
माणसा उगाच न झुरवे
जीवन हे सुख: दुखांनी भरलेले
तरीही नित्य नवीन भासणारे
मग माणूस नवा का नाही ?
का भावनांच्या पाशात गुरफटलेला ?

-SE EXTC, Ms. Supriya Dumbre

## उजाळा

मातीत दडलेला अंकुर
डोकावतोच कधीतरी
आठवण देतोच देतो
त्या रम्य दिवसांची |

वाटतं लगेच निघावं
आस्थेनं सर्वांना भेटावं
कसं चाललय विचारावं
पण निघणच होत नाही |

दिवस किती होते छान
मित्र, मैत्रिणी, गुरूजन
ते आवडते प्रांगण
पण निघणच होत नाही |

किती मजेत होतो सारे
ते विनोद नि आरेकारे
फुटणारे अकलेचे तारे
पण निघणच होत नाही |

आता नाहीच थांबणार
भेटणार म्हणजे भेटणार
प्रदिर्घ दुरावे संपणार
अन् त्या सुंदर दिवसांच्या
आठवणींना **उजाळा** देणार |

Prof. Nutan Malekar